Volume 8 (Special Issue 11)
April, 2018

ISSN - 2230 - 9578

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS
IMPACT FACTOR
4.270
UGC Journal list No. 64768







१४ एप्रिल २०१८ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त...

# सामाजिक समतेचे प्रणेते - महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**Editor : Dr. R.V. Bhole**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email - info@jrdrb.com    Visit - www.jrdrvb.com

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal

4.270

UGC Journal list No. 64768

Volume 8, Special Issue 11, April 2018

ISSN-2230-9578


१४ एप्रिल २०१८ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त...

# सामाजिक समतेचे प्रणेते : महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर


**Special Issue Editor**

**Dr. Madhukar Desale**
Mahila College
Nandurbar Dist. Nandurbar

**Prof. Gautam Thorat**
Sarvajanik Arts & Comm College
Visarwadi Dist. Nandurbar

**Dr. Nishant Shende**
G.T. Patil College
Nandurbar Dist. Nandurbar

**Editor**

Dr. R.V. Bhole

**Editorial Board**

**Prin. Dr. A.T. Patil,** Sarvajanik Arts & Comm. College, Visarwadi Dist. Nandurbar
**Prin. Dr. A.S. Paithane,** V.V.M.'s Arts & Comm. College, Akkalkuwa Dist. Nandurbar
**Prin. Dr. D.S. Nikumbh,** ASC College, Chalisgaon, Dist. Jalgaon
**Dr. M.J. Raghuwanshi,** Vice Principal, G.T.P.College, Nandurbar
**Dr. Vijay G. Gurav,** Adarsh College of Arts, Nijampur-Jaitane
**Dr. Sunil V. Kuwar,** T.E.S.'s Mahila College, Nandurbar
**Dr. D.U. Rathod,** Nandinibai College, Jalgaon
**Dr. Vasudev Vale,** Arts, Comm. & Science College, Pachora Dist. Jalgaon


'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

Email - info@jrdrvb.com Visit - www.jrdrvb.com

# "सामाजिक समतेचे प्रणेते : महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर"

## अनुक्रमणिका


| Sr. No. | Name | Title of the Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | Dr. Smriti Bhosle | Dr. Ambedkar's Dalit Liberation Approach | 1-4 |
| 02 | प्रा.डॉ. दिलीपसिंह श. निकुंभ | समाजसुधारक : महात्मा ज्योतिबा फुले | 5-8 |
| 03 | प्राचार्य, डॉ एस.एस. शिंदे | डॉ.बाबासाहेबांचा जीवनपट व शैक्षणिक विचार | 9-12 |
| 04 | Dr. Ashok Pitambar Khairnar | Dr. Babasaheb Ambedkar on the Annihilation of Caste and Buddha's Dhamma | 13-18 |
| 05 | प्रा. डॉ.टी.ए. मोरे | फुले-शाहू-आंबेडकर प्रेरणा - एक दृष्टिक्षेप | 19-22 |
| 06 | प्रा.डॉ. प्रकाश अर्जुन भामरे | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धम्मविचार | 23-26 |
| 07 | प्रा. डॉ. सुरेश आर. वराडे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पत्रकारितेतील योगदान | 27-30 |
| 08 | प्रा.डॉ. विजय जी. गुरव | दलित साहित्य के प्रेरणास्त्रोत : महात्मा जोतीराव फुले | 31-33 |
| 09 | डॉ.विजया विनायक पाटील | स्त्रीयांविषयक कायदे निर्मितीत राजर्षी शाहू महाराजांचे योगदान | 34-37 |
| 10 | डॉ. संभाजी संतोष पाटील | महात्मा जोतीराव फुले यांच्या विधायक विचारधारेचा विश्लेषणात्मक अभ्यास | 38-41 |
| 11 | डॉ. भामरे नानाजी दगा | महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार | 42-44 |
| 12 | डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे | क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या शैक्षणिक कार्याची चळवळ | 45-48 |
| 13 | प्रा.डॉ. आर.एम. साळुंके | जोतिराव फुले का हंटर कमीशन से निवेदन | 49-51 |
| 14 | डॉ. महेश व्ही. गांगुर्डे | म. जोतीराव फुले की ग्रंथ-संपदा | 52-54 |
| 15 | डॉ. भगवान सतन पाटील | राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्यातील योगदान | 55-57 |
| 16 | डॉ. दिनकर संतुकराव कळंबे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना | 58-60 |
| 17 | डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे | राजर्षी शाहु महाराजांची आरक्षण विषयक भुमिका | 61-63 |
| 18 | प्रा.डॉ.बालासाहेब किलचे | भारतीय लोकशाहीची सद्यस्थिती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर | 64-67 |
| 19 | डॉ. चंद्रशेखर वाणी | डॉ.बाबासाहेब आंबेडकर, विदेशात शिक्षण एक तपश्चर्या... | 68-70 |
| 20 | प्रा.डॉ.अंभुरे एस.डी. | छत्रपती शाहू महाराजांचे विविध कला क्षेत्र विषयक धोरण | 71-73 |

**Journal of Research & Development** Vol. 8 (Special Issue 11) April 2018, (ISSN-2230-9578)
UGC Journal List No. 64768, COSMOS IMPACT FACTOR - 4.270

# स्त्रीयांविषयक कायदे निर्मितीत राजर्षी शाहू महाराजांचे योगदान

**डॉ.विजया विनायक पाटील (सहयोगी प्राध्यापक)**
**शिक्षणशास्त्र विद्याशाखा**
**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

## प्रास्ताविक -

भारत देशाच्या कट्टर पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्री जातीवर अनेक अत्याचार व अन्याय होत होते. स्त्रियांचे जीवन पडदा पद्धत, विधवा-विवाहबंदी, शिक्षणबंदी, बालविवाह यांसारख्या रूढी परंपरांनी पूर्णपणे जखडले होते. यावर वाचा फोडण्याचे कार्य अनेक समाजसुधारकांनी केले. त्यात म. ज्योतीराव फुले, आगरकर यांचा समावेश होता. महर्षी कर्व्यांनी देखील स्त्री शिक्षणाचे प्रयत्न केले. महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षणाची चळवळ सुरु केली. वास्तविक पाहता ती स्त्री मुक्तीची चळवळ होती. राजर्षी शाहू महाराजांनी ह्या चळवळीस प्रोत्साहन दिले. परंतु स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करणारे अनेक कायदे ही अंमलात आणले. स्त्रियांची समाजाकडून, कुटुंबाकडून होणारी पिळवणूक रोखण्याचा मोठा प्रयत्न केला. राजर्षी शाहू महाराजांनी स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी अनेक कायदे केलेत.

## (१) विधवा पुनर्विवाह कायदा -

शाहू महाराजांनी जुलै १९१७ मध्ये आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला. विधवांच्या पुनर्विवाहामध्ये अनेक अडचणी येत होत्या. त्या कायद्याच्या आधारे दूर केल्या. त्यामुळे स्त्रीवर्गावर होणाऱ्या अन्यायाच्या प्रतिकाराचे एक साधन उपलब्ध झाले. शाहू महाराजांच्या मते विधवा विवाहास कायदेशीर मान्यता असते. ही समाज स्वास्थासाठी अत्यंत आवश्यक बाब आहे. १९१९ साली कानपूरच्या कुर्मीक्षत्रिय परिषदेत कुर्मी क्षत्रीयांमध्ये विधवा विवाह पाहून समाधान व्यक्त केले होते. क्षत्रिय, जात, भृण, व्यभिचार इ. जाचापासून सुरक्षित राहील असा विश्वास व्यक्त केला. तसेच पडदा पद्धतीचा जाहीर निषेध केला. भारतवासीयांमध्ये पडदा पद्धत, विधवाविवाह निषेध व कोणाशीही मिसळून भोजन न करणे ह्या बाबी प्रगतीला हानिकारक आहेत, असे स्पष्ट मत होते. अनेक क्षत्रिय महिलांनी राज्याचा गाडाही हाकला आहे, रणांगणावर शत्रूसोबत लढाया केलेल्या आहेत. त्या पडदा पद्धतीत असत्या तर हे शक्य झाले नसते. शाहू महाराजांना स्त्रीयांवरील अन्यायाची प्रचंड चीड होती. समाजातला आंतरजातीय विवाह कायदा करून शाहू महाराजांनी स्त्री-पुरुषांच्या सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करून एक क्रांतिकारी पाऊल उचलले होते.

## (२) आंतरजातीय विवाह कायदा -

हा कायदा १२ जुलै १९१९ मध्ये कोल्हापूर इलाख्यातील 'विवाहसंबंधी कायदा' या नावाने प्रसिध्द झाला. त्या काळात आंतरजातीय/आंतरधर्मीय विवाह शास्त्रसंमत नसल्याने ते बेकायदेशीर ठरत असे. विवाह धाडसाने करणाऱ्यांची विशेषतः स्त्रीयांची, मोठी ससेहोलपट होत असे. महाराजांनी असे विवाह कायदेशीर ठरवणारा व धर्मातील रूढींना फाटा देऊन ज्यांना नोंदणी पद्धतीने विवाह करायचा असेल त्यांना तसे कायदेशीर स्वातंत्र्य देणारा कायदा अंमलात आणला. समाजसुधारणेच्या क्षेत्रातील हे एक क्रांतिकारक पाऊल होते.

या सुमारास सन १९१८ साली, मध्यवर्ती कायदेमंडळात विठ्ठलभाई पटेल यांनी आंतरजातीय विवाह कायदेशीर ठरविणारे बिल मांडले होते. हे बिल हिंदुस्तानच्या इतिहासात 'पटेल बिल' या नावाने प्रसिध्द पावले. या बिलास सनातन्यांचे पुढारी, शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांचा तर कडवा विरोध झालाच शिवाय पं. मदनमोहन मालवीय सारख्यांनीही आपली प्रतिकूलता दर्शवली. तथापि गुरुदेव रवींद्रनाथ टागोर, योगी अरविंद, लाला लजपतराय यासारख्या अनेक थोर पुरुषांनी त्यास पाठिंबा दिला. महाराष्ट्रात ब्राम्हणेतर पक्षांच्या मंडळींनी हे बिल उचलून धरले. पटेल बिलाच्या रूपाने सनातनी सुधारक यांच्यामधील संघर्ष पराकोटीस पोहचला होता. या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांचा हा कायदा अनेक दृष्टीने लक्षणीय ठरतो.

या कायद्याअंतर्गत विवाह नोंदणीच्या वेळी वराचे वय १८ वर्षे व वधूचे वय १४ वर्षे असले पाहिजे असा निर्बंध घातला गेला. तसेच १८ वर्षे पूर्ण झालेल्या वधूस असा विवाह करण्यास पालकाच्या संमतीची गरज राहिली नाही. यापूर्वी सन १८९१ साली मध्यवर्ती कायदे मंडळाने 'संमती वयाचे बिल' पास करून विवाहाच्या वेळी वधूचे वय कमीत कमी १२ वर्षे असले पाहिजे असा निर्बंध घातला होता. या कायद्याविरुध्दही हा हिंदू धर्मावर हल्ला आहे, असा जोरदार आक्षेप त्यावेळी लो.